N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): पुणे शहर
P.S.(ठाणे): स्वारगेट
Year (वर्ष): 2022
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0069
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 06/04/2022 15:45 वजे

2. S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम) Sections (कलम)

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
1. Day(दिवस): दरमियानी दिन
Time Period (कालावधी):
Date From (दिनांक पासून): 10/08/2021
Date To ( दिनांक पर्यंत): 23/08/2021
Time From (वेळेपासून): 00:00 वजे
Time To (वेळेपर्यंत): 00:00 वजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक ): 06/04/2022 Time (वेळ): 15:18 वजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ
Entry No. (नोंद क्र.): 026 Date & Time (दिनांक आणि वेळ): 06/04/2022 15:18 वजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):
1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 2 किमी
Beat No. (बिट क्र.):
(b) Address (पत्ता): कषी उत्पन,बाजार समिति मार्केटयार्ड,श्री छत्रपती शिवाजी मार्केटयाड, गुलटेकडी, पुणे

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):
(a) Name (नाव): श्रीमती विजयमाला महादेव पवार
(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :
(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1983
(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत
(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):
(f) Passport No.(पारपत्र क्र.):
Date of Issue (दिल्याची तारीख):
Place of Issue (दिल्याचे ठिकाण):
(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|



Scanned by CamScanner

| S.No.(अ. क्र.) | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
| --- | --- | --- |
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
| --- | --- | --- |
| 1 | वर्तमान पत्ता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,स्वारगेट,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे,स्वारगेट,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-7720008655

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
| --- | --- | --- | --- | --- |
| 1 | श्री अरविंद फडतरे | | | 1. कात्रज पुणे ,स्वारगेट,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | प्रमोद तुपे | | | 1. कोथरुड पुणे ,स्वारगेट,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
| --- | --- | --- | --- | --- |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
| --- | --- |

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी श्रीमती विजयमाला महादेव पवार, वय 39 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.मो.क्र.7720008655. मी वरिलप्रमाणे असुन, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिनांक 17/11/2020 रोजी पासून नेमणुकीस आहे. तक्रारदार श्री सिध्देश सुशिल बोहरा वय 26 वर्षे धंदा- व्यवसाय, बांधकाम क्रन्ट्रक्टर रा.2/10 सुपार्श्वनाथ सोसायटी, मार्केट यार्ड, पुणे -37 मोनं 9767591591.यांनी दि.10/08/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे लेखी तक्रार दिली होती. ती पुढीलप्रमाणे, मी वरील प्रमाणे असुन वरील नमुद ठिकाणी रहावयास आहे. मी व माझे मित्र 1) संकेत ललित खाबीया वय 26 वर्षे रा गुजरमळा, शिरुर, पुणे मोनं 8888253421 2) अक्षय विरेंन्द्र भंडारी वय 29 वर्षे, रा. न्यु गजरा सोसायटी, फ्लट नं 4, बिबवेवाडी पुणे-37. मोनं 9130680680 असे आम्ही तिघे बांधकाम व्यवसायिक असुन बांधकामाची कामे एकत्रितारित्या करीत असतो. माझी सिध्देश बोहरा इन्फ्रा प्रोजेक्ट एलएलपी नावाची कंपनी आहे. माझे कंपनी मध्ये माझा मित्र अक्षय भंडारी हा सुपरवायझर म्हणून काम पाहतो. माझा मित्र संकेत ललित खाबीया याचे नावे 1) कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे च्या पान बाजार विभागातील तळमजल्यावरील स्वच्छता गृहाचे नुतनिकरण करणे 2) कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे च्या उदयोग भवन क्र.1 येथील पहील्या मजल्याच्या स्लब चे वटर प्रुफींग करणे अशी दोन कामे दिनांक 01/07/2020 रोजी मिळाली होती. या दोन्ही कामांची वर्क ऑर्डर माझा मित्र संकेत ललित खाबीया याने माझे सिध्देश बोहरा इन्फ्रा प्रोजेक्ट एलएलपी कंपनीस दिली होती. सदरचे दोन्ही कामे मी व अक्षय विरेंन्द्र भंडारी असे दोघे मिळुन करीत होतो. आम्ही कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे च्या पान बाजार विभागातील तळमजल्यावरील स्वच्छता गृहाचे नुतनिकरण करणे हे काम नोव्हेंबर 2020 मध्ये पुर्ण केलेले असून त्या कामाचे बिल 8,48,993/- रुपये जानेवारी 2021 मध्ये मंजुर झालेले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे च्या उदयोग भवन क्र.1 येथील पहिल्या मजल्याच्या स्लब चे वटर प्रुफींग करणे हे काम एप्रिल 2021 मध्ये पुर्ण करण्यात आलेले असून त्याबाबत प्रशासक, कृषी उत्पन्न बाजार समिती, श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्ड, गुलटेकटी, पुणे. यांना लेखी कळविले होते. श्री अमित दसारे हे कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे यांचेवतीने कामाची गुणवत्ता तपासण्याचे काम करतात. सदर कामाचे बिल मिळणेसाठी श्री अमित दसारे यांचेकडे मी व माझा मित्र अक्षय भंडारी असे दोघे पाठपुरावा करत होतो. जुलै 2021 मध्ये श्री अमित दसारे यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे च्या उदयोग भवन क्र.1 येथील पहिल्या मजल्याच्या स्लब चे वटर प्रुफींग करणे या कामाचे



Scanned by CamScanner

10,68,177.86/- रुपये बिल व गुणवत्ते संदर्भातील अहवाल त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे यांना सादर केल्याचे फोनवर कळविले. त्यानंतर लगेच मी व माझा मित्र अक्षय भंडारी असे दोघे श्री अरविंद फडतरे, उपअभियंता, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे यांना जावून प्रत्यक्ष भेटलो. त्यावेळी त्यांनी दोन्ही कामाच्या एकत्रित बिलाच्या रकमेच्या पंधरा टक्के रक्कम त्यांना मोबदला म्हणुन दयावी लागेल असे सांगून पंधरा टक्के रक्कम मिळताच बिल मंजुर करतो असे सांगितले. दिनांक 10/08/2021 रोजी माझा मित्र संकेत खावीया याचे मोनं 8888253421 यावर कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे यावरुन फोनवर सांगीतले. कि, तुम्हाला ब्लक लिस्ट करण्यात आलेले असून तुमच्या कामाचे बील मंजुर होणार नाही. असे सांगण्यात आले. श्री अरविंद फडतरे, उपअभियंता, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे यांना दोन्ही कामाच्या एकत्रित बिलाच्या रकमेच्या पंधरा टक्के रक्कम त्यांना आगाऊ देणेबाबत आम्ही त्यांना होकार दिला नसल्याने दिनांक 10/08/2021 रोजी संकेत खावीया यांना ब्लक लिस्ट करण्यात आलेबाबत कळविले आहे. श्री अरविंद फडतरे हे मागत असलेली पंधरा टक्के ही रक्कम लाच रक्कम असून मी आज त्यांची भेट घेऊन माझ्या बिल संबंधाने चर्चा करणार आहे. तरी त्यांचेवर आपले विभागाकडुन कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.तक्रारदार श्री सिध्देश सुशिल बोहरा यांनी वर नमुद दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने मी, तक्रारदार यांना पडताळणी करणेकामी दि. 10/08/2021 रोजी पंचासह रेकर्डर सोबत देवुन लोकसेवक श्री. अरविंद फडतरे यांना भेटण्यास कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केटयार्ड, श्री छत्रपती शिवाजी मार्केटयाड, गुलटेकडी, पुणे येथे पाठविले. सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्री. बोहरा व लोकसेवक श्री. फडतरे यांची भेट न झाल्यामुळे व लोकसेवक श्री तुपे यांनी श्री फडतरे हे उदया ऑफिसला येणार आहेत असे सांगितल्याने सदरची पडताळणी कारवाई दि. 11/10/2021 रोजी करण्याचे ठरले. सदरचा पडताळणी पंचनामा करण्यात आला असुन. सदर पडताळणी दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेले संभाषणाची स्क्रीप्ट तयार करण्यात आली आहे. दि.11/08/2021 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक फडतरे उपअभियंता व लोकसेवक श्री तुपे उपअभियंता यांनी तक्रारदार यांचेकडे प्रलंबित कामाची चर्चा करुन कामाच्या बिलाच्या रकमेच्या 12 टक्के रक्कम लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सदरची रक्कम ते त्यांचे वरिष्ठांना दयावयाची असल्याचे ते वारंवार सांगत होते. लोकसेवक श्री फडतरे व लोकसेवक श्री तुपे यांनी तक्रारदार यांना त्यांनी फोन केल्यावर येण्यास सांगितले असल्याने पुढील कारवाई तक्रारदार श्री बोहरा यांना लोकसेवक श्री तुपे यांचा फोन आल्यानंतर करावी असे तक्रारदार यांनी आम्हास सांगितले. त्यामुळे सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करण्याचे ठरविण्यात आले. सदरचा पडताळणी पंचनामा करण्यात आला असुन. पडताळणी दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेले संभाषणाची स्क्रीप्ट तयार करण्यात आली आहे.दि. 21/08/2021 रोजी आम्हास तक्रारदार श्री बोहरा यांनी सकाळी 11.00 वा फोनव्दारे कळविले की, मला लोकसेवक श्री फडतरे साहेब यांचा फोन आला असून त्यांनी मला आज ऑफिसला बोलावले आहे असे सांगितले. त्याप्रमाणे दि.21/08/2021 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक फडतरे उपअभियंता व लोकसेवक श्री तुपे यांनी दोन लाख रुपये मागणी करुन मंगळवारी 50 हजार रुपये देण्याचे व उर्वरीत रक्कम चेक मिळाल्यानंतर देण्याचे ठरले होते परंतु पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री तुपे व श्री फडतरे हे संभाषणा दरम्यान वारंवार सदरची लाच रक्कम ही त्यांचे साहेबांसाठी असल्याचे सांगत असल्याने सदर लाच मागणी मध्ये त्यांचे साहेब /वरिष्ठ अधिकारी लोकसेवक मधुकांत गराड (डीडीआर) यांचा सहभाग आहे अगर कसे ? यांची पडताळणी करणे आवश्यक असल्याने त्यांचेकडे देखील पडताळणी करण्याचे ठरविले व त्या दिवशीचा पडताळणी पंचनामा पुर्णकरण्यात आला असून सदर पडताळणी दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट तयार करण्यात आली आहे. त्यानुसार दि. 23/08/2021 रोजी तक्रारदार श्री बोहरा यांचेकडे लोकसेवक श्री फडतरे यांचे वरिष्ठ अधिकारी श्री मधुकांत गराड हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याबाबतची पडताळणी कारवाई करणेकामी पंचासह पाठविले असता त्यावेळेस श्री तुपे यांची भेट झाली श्री तुपे यांनी साहेब बाहेर गेले आहेत असे सांगून साहेबांना भेटण्याची गरज नाही असेही सांगितले. श्री मधुकांत गराड यांची भेट न झाल्याने आम्ही सदरची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्याचे ठरविण्यात आले. सदरचा पडताळणी पंचनामा करण्यात आला असुन पडताळणी दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेले संभाषणाची स्क्रीप्ट तयार करण्यात आली आहे.नमुद प्रकरणातील पडताळणी कारवाईबाबत तसेच पुढील सापळा कारवाईबाबत तक्रारदार श्री बोहरा यांना वेळोवेळी संपर्क साधुन, संदेश पाठवुन तसेच लेखी पत्र पाठवून पुढील कारवाई साठी लाप्रवि पुणे कार्यालयात हजर राहणेस कळविले परंतु त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही व लाप्रवि पुणे कार्यालयात येणे टाळले आहे. दिनांक 10/08/2021 रोजीच्या तक्रारदार श्री बोहरा यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 10/08/2021, 11/08/2021, 21/08/2021 व दिनांक 23/08/2021 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी मध्ये लोकसेवक श्री फडतरे, व लोकसेवक श्री तुपे यांनी बिलाच्या मंजुरीसाठी तक्रारदाराकडे दोन लाख रुपये लाच मागणी करुन त्यापैकी 50,000/-(पन्नास हजार रुपये) मंगळवार दिनांक 24/08/2021 रोजी देण्यास व उर्वरित रक्कम बिलाचा चेक मिळाल्यानंतर देण्यास सांगीतले.लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कडुन करण्यात आलेल्या वरील पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटना प्रत्यक्ष तसेच ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण यावरुन तक्रारदारांनी केलेल्या कामाच्या बिलाच्या मंजुरीसाठी वरील प्रमाणे तक्रारदार श्री सिध्देश सुशिल बोहरा यांचेकडे लोकसेवक श्री अरविंद फडतरे, उप अभियंता व श्री तुपे, उपअभियंता, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे यांनी त्यांचेसाठी तसेच त्यांचे साहेबांसाठी लाचेची मागणी केली. म्हणून माझी सरकारतर्फे त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988चे कलम 7,7अ,12 प्रमाणे फिर्याद आहे. हा जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखित केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे. समक्षहा फिर्यादी जबाब दिला

13. Action (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याने.) Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at or (किंवा)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): somanath dattatary jadhav

Rank (पद): I (Inspector)

No.(क्र.): API

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

Scanned by CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): ashok dharmaji indalkar
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): psmah74266



Scanned by CamScanner